39

सार्वजनिक आरोग्य विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक ८ जुलै २००३

भारताचे संविधान

क्र.आरटीआर-१००२/प्र.क्र.१२०/सेवा-१

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आरोग्य सेवा संचालनालयाच्या सेवेतील आरोग्य सहाय्यक, आरोग्य पर्यवेक्षक व अवैद्यकीय आरोग्य अधिकारी, वर्ग-३ या पदांवरील सेवाप्रवेश नियम, १९९३ मध्ये दुरुस्तीचे खालील नियम करीत आहेत, असे :

१. या नियमांना आरोग्य सेवा संचालनालयातील आरोग्य सहाय्यक, आरोग्य पर्यवेक्षक व अवैद्यकीय आरोग्य अधिकारी, वर्ग-३ सेवाप्रवेश (दुरुस्ती) नियम, २००३ असे वाचावे.

२. आरोग्य सेवा संचालनालयातील आरोग्य सहाय्यक, आरोग्य पर्यवेक्षक व अवैद्यकीय आरोग्य अधिकारी, वर्ग-३ सेवाप्रवेश नियम, १९९३ (यापुढे मूळ

नियम असे संबोधण्यात यावे.) मधील "वर्ग-३" या श...

आकऱ्याऐवजी "गट-क" शब्द समाविष्ट करण्यात यावा.

३. मूळ नियमातील नियम-३,

(अ) खंड (ब), मधील "त्या पदावरील या शब्दाऐवजी " त्या पदावरील . आणि " हा शब्द समाविष्ट करण्यात यावा.

(ब) खंड (ब) नंतर खालील खंड समाविष्ट करण्यात यावा. जसे :-

(क) आरोग्य सेवा संचालनालयामार्फत घेण्यात येणारे आरोग्य सहाय्यक पदावर पदोन्नतीचे तीन महिन्याचे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेले असावे."

४. मूळ नियमांच्या नियम ८ नंतर खालील नियम समाविष्ट करण्यात यावा.

" ९ नियम ३, ४ आणि ६ मध्ये नमूद केलेल्या पदावरील नियुक्त व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी/ वापराबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ह.कि.जाधव)

महाराष्ट्र शासनाचे उपसचिव